३०

**महाराष्ट्र शासन**

पर्यावरण विभाग

शासन निर्णय क्र.इएनव्ही-२०११/प्र.क्र.११३/तां.क.३

१५ वा मजला, नवीन प्रशासन भवन,

मादाम कामा रोड, मुंबई-४०००३२.

दिनांक : २६ मार्च, २०१२

वाचा :

या विभागाचा समक्रमांकाचे शासन निर्णय, दिनांक १८ जानेवारी, २०१२.

**प्रस्तावना :**

पर्यावरण विषयक व्यापक जनजागृती करण्यासाठी दिनांक ५ जून, २०१२ या जागतिक पर्यावरण दिनानिमित्त राज्य स्तरावर विविध स्पर्धांचे आयोजन करण्यास उपरोक्त दिनांक २६ मार्च, २०१२ च्या शासन निर्णयान्वये नियोजन विभागाचा सहमतीने मान्यता देण्यात आली आहे. सदर स्पर्धेचे आयोजन पर्यावरण विभाग, सेंटर फॉर एन्व्हायर्नमेंट एज्युकेशन (CEE) पुणे यांचेमार्फत करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे. उपरोक्त जागतिक पर्यावरण दिनी आयोजित करावयाच्या समारंभाचा अनुषंगाने, या पुरस्कारांचे वितरण विजेत्यांना करण्यासाठी तसेच CEE यांचेमार्फत सदर स्पर्धेचे आयोजन करण्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या अनुदानापैकी काही रक्कम CEE, पुणे यांना मुक्त करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन निर्णय :**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त शासन स्तरावर विविध स्पर्धांचे आयोजन करण्यासाठी सेंटर फॉर एन्व्हायर्नमेंट एज्युकेशन (CEE), पुणे यांचेमार्फत सदर कार्यक्रम राबविण्यासाठी दिनांक १८ जानेवारी,२०१२ च्या शासन निर्णयाद्वारे CEE यांना रु.२५,१६,८००/- एवढे अनुदान मंजूर करण्यात आले आहे. सदर रकमेमधून रु. २०.०० लाख (रुपये वीस लाख फक्त) एवढी रक्कम या शासन निर्णयाद्वारे सेंटर फॉर एन्व्हायर्नमेंट एज्युकेशन (CEE), पुणे यांना मुक्त करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त रकमेचा धनादेश "Centre for Environment Education", Pune यांच्या नावे काढण्यात यावा.

३. सदरहू मुक्त रक्कम रु.२०.०० लाख अधिदान व लेखाधिकारी यांच्यामार्फत कोषागारातून काढून **Centre for Environment Education,Pune** यांना अदा करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून श्री. दे.के. मानकर, अवरसचिव, पर्यावरण विभाग व नियंत्रण अधिकारी म्हणून श्री. श्या. ना. धकाते, सहसचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय यांना घोषित करण्यात येत आहे. त्यांनी **Centre for Environment Education,Pune** यांना रु.२०.०० लाख (अक्षरी रुपये वीस लाख फक्त) अधिदान व लेखाधिकारी कार्यालय, मुंबई येथून स्वतंत्र धनादेशाद्वारे वितरीत करण्याची कार्यवाही करावी.

४. यासाठी होणारा खर्च मागणी क्र.यु-४, ३४३५-परिस्थितीकी व पर्यावरण,०४.प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण १०३,वायु व जल प्रदुषण प्रतिबंध-पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना (०२) पर्यावरण प्रतिबंध (०२)(१३) पर्यावरण विषयक जनजागृती, शिक्षण व वातावरण बदल कृति योजना (३४३५ १३०२) ३१, सहाय्यक अनुदान (वेतनेतर) या या मुख्य लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा व तो सन २०११-१२ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. सन २०११-१२ या आर्थिक वर्षात उपरोक्त कार्यक्रमासाठी एकूण रु.३००.०० लक्ष एवढी तरतुद मंजूर व अर्थसंकल्पीत करण्यात आलेली आहे.

५.	हा शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. अंदाज २०११/प्र.क्र.९३/२०११/अर्थसंकल्प-३ दिनांक ५-३-२०१२च्या सूचनांनुसार वित्त विभाग शासन निर्णय क्र. विअप्र १००८/विनियमन, दिनांक १५ मे २००९ वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग पहिला उप विभाग तीन मधील अनुक्रमांक ४, नियम क्रमांक २७()२) अन्वये प्रशासकीय विभागाला प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून निर्गमित करण्यात येतआहे.

६.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर www.maharashtra.gov.in उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्र.२०१२०३२७१२५१५२३५२००१ आहे.

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(दे. के. मानकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. मंत्री (पर्यावरण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. राज्यमंत्री (पर्यावरण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
मुख्य सचिव यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
संचालक, सेंटर फॉर एन्व्हायर्नमेंट एज्युकेशन, सेंट्रल रिजनल सेल, पुणे,
सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, सायन, मुंबई,
सचिव (पर्यावरण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञयेतना/लेखापरिक्षा) महा-१ व महा-२, मुंबई/नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
वित्त विभाग (अर्थ-५/व्यय-१६), मंत्रालय, मुंबई,
पर्यावरण विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती.